ॐ

# अध्याय अठरावा

१ पार्थ प्रार्थी माधवाप्रती ‘पुरवीं मम जिज्ञासा
पृथक् त्याग-संन्यास-तत्त्व तें विवरोनि हृषीकेशा.’ १

२ श्रीकृष्ण म्हणे, ‘‘पार्था, करणें त्याग काम्य कर्मांचा
ज्ञाते निरुतीं हा चि जाणती आशय संन्यासाचा २

आणि सोडणें संपूर्णपणें फल सकल हि कर्मांचें
जाण किरीटी, ज्ञाते वदती रहस्य हें त्यागाचें ३

३ कर्म-मात्र तें सदोष, होतें बंधनकारक म्हणुनी
त्याज्य सर्वथा म्हणती पार्था, ऐसें पंडित कोणी ४

यज्ञ-दान-तप इत्यादिक तीं आवश्यक करणीय
नच त्याज्य तीं ऐसें म्हणती कोणी पंडितवर्य ५

४ तरी भारता, ऐक तूं अतां त्यागाचा इत्यर्थ
निश्चित कथितों असे त्याग तो त्रि-विध वर्णिला येथ ६

५ यज्ञ-दान-तप इत्यादिक तीं कर्मे न च सोडावीं
पावन करिती जाणत्यांसही म्हणुनी चि अनुष्ठावीं ७

रज-तम झडती सात्त्विक वृत्ती प्रकटे सत्कर्मांनीं
जीं अनुष्ठितां पावे ज्ञाता तें नैष्कर्म्य निदानीं ८

न बंध पावे कसा स्वभावें ज्ञानी कर्मे करुनी
ती हातवटी तुजसि किरीटी दावितों चि घे ध्यानीं ९

६ फलाभिलाषा त्यजुनी पार्था, होउनियां निःसंग
कर्तव्य करीं हा अवधारीं निरोप माझा चांग १०

७ कार्य नेमिलें ओघा आलें स्वभावें चि जें येथें
तें संन्यसिलें तरी न च भलें भरत-सत्तमा, निरुतें ११

नियत कर्म तें त्यजिलें जातें होउनि मोहाधीन
तरी बोलती त्या त्यागातें 'राजस' जाण सु-जाण १२

८ स्व-कर्म भासे कष्टप्रदसें म्हणुनि राखुनी अंग
त्यजी तरी तो पार्था, होतो जाण 'राजस' त्याग १३

त्याग चि होतो परि उपयोगी न च तो फल-निर्वाहा
अग्नींत उते दुग्ध म्हणों ये काय 'अग्नये स्वाहा' ! १४

९ कर्म नेमिलें कर्तव्य भलें तें चि जाणुनी चांग
करणें त्यजुनी संग-फलाशा तो चि 'सात्त्विक' त्याग १५

फल त्यागितां तो स्वभावतां होतो कर्म-त्याग
मनीं कामना तरी अर्जुना, त्याग चि होतो भोग ! १६

१० संशय-रहित प्रज्ञावंत त्यागी सत्त्वाविष्ट
न धरी प्रीति-द्वेष सर्वथा कर्मी इष्टानिष्ट १७

११ कर्म सोडणें अशेष न च तें शक्य देहवंतास
म्हणुनी सोडी कर्म-फला जो म्हणती त्यागी त्यास १८

१२ असे त्रि-विध तें फल कर्माचें मिश्रित इष्ट अनिष्ट
तें देहांतीं घडे भोगणें त्याग-विहीना स्पष्ट १९

सम-भागें तीं जरीं मिसळती कर्में इष्टानिष्ट
तरी तयांचें फल तें साचें मानव-देह-विशिष्ट २०

घडलें येथें इष्ट कर्म तें तरी जन्म सुर-लोकीं
अनिष्ट घडतां कृमि-कीटकता निकृष्ट लाभे नरकीं २१

परि धनंजया, कर्म करुनियां राहे चि अनासक्त
आस नच धरी जो कर्म-फलीं तो संन्यासी मुक्त २२

आत्मानुभवें तया स्वभावें जगीं नच उरे द्वैत
बद्ध नच गुणीं नेणे म्हणुनी तो कर्मांची मात २३

१३ मजपासोनी घेई जाणुनी ज्ञात्यांचा सिद्धान्त
परभारें तीं कर्म साधिती पांच कारणें येथ २४

अलिप्त असतें आत्म-तत्त्व तें हेतु ना उपादान
येतें जातें अभ्र, राहतें निर्लेप जसें गगन २५

१४ अधिष्ठान तें द्वितीय कर्ता तिजें पृथग्विध करण
वेगवेगळ्या तशा त्या क्रिया दैव पांचवें जाण २६

कारण पहिलें ‘देह’ जाहलें अधिष्ठान तें येथ
द्वितीय कर्ता ‘जीव’ सर्वथा अहंकार-संयुक्त २७

प्रकृती चि करी कर्में सारीं ‘जीव’ म्हणे ‘मी कर्ता’
अलिप्त असतां भ्रमें अहंता धरुनी होतो भोक्ता २८

‘करण पृथग्विध’ कारण तिसरें जाण इंद्रियें सर्व
ज्यांच्या द्वारा इथे फांकते बुद्धीची जाणीव २९

देहीं होती नाना रीती वायूचे व्यवहार
पार्था, येथें कारण चौथें पाहें तें साचार ३०

आणि इंद्रियानुग्राहक जीं सर्व दैवतें येथें
तें चि पांचवें त्वां जाणावें कारण पार्था, निरुतें ३१

१५ काया-वाचा-मनें नर करी जीं धर्माधर्माचीं
कर्में जगतीं जाण त्यांप्रती पांच कारणें हीं चि ३२

१६ ऐसें असतां मानी कर्ता तेथ शुद्ध आत्म्यातें
तरी मूढ संस्कार-हीन तो न च जाणे तत्त्वातें ३३

१७ अहं-भावना लुप्त जाहली ज्याची बुद्धि अलिप्त
तो विश्व वधीं तरी न च वधी तो संसारीं मुक्त ! ३४

दृश्य-द्रष्टा जाय आटुनी कर्म आणखीं कर्ता
आत्मानुभवें होय आघवें ब्रह्म तयातें पार्था ३५

नेणें येथें कसा रहाटे काय इंद्रिय-ग्राम
असुनी देही जाण विदेही तो पूर्ण पर-ब्रह्म ३६

१८ कर्माचीं हीं प्रेरक तिन्ही ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान
कारण कर्ता क्रिया तिहेरी कर्म-समुच्चय जाण ३७

१९ ज्ञानीं कर्मीं कर्त्यामाजीं असे त्रि-विध गुण-भेद
सांख्य वर्णिती तसा ऐक तो कथितों तुजसी विशद ३८

२० विभक्त भूतीं भाव निश्चितीं अव्यय एक अभिन्न
जेणें ज्ञानें हें अनुभविणें तें चि 'सात्त्विक' ज्ञान ३९

२१ नाना-विध ते वेगवेगळे भाव भूतमात्रांत
पृथक्त्वें चि जें ज्ञान जाणतें तें 'राजस' निभ्रांत ४०

२२ वृथा गुंतलें तिथे एकलें देह सार मानून
जाण 'तामस' ज्ञान तुच्छ तें जें तत्त्वार्थ-विहीन ४१

२३ केलें प्रीति-द्वेष वर्जुनी निष्कामत्वें पूर्ण
नियत कर्म जें निःसंगपणें तें तूं 'सात्त्विक' जाण ४२

२४ केलें पार्था, धरुनि अहंता आणि कामना चित्तीं
बहु आयासें कर्म जें असें त्यातें 'राजस' म्हणती ४३

२५ हिंसा हानी बळ निष्पत्ती न च विचारितां चित्तीं
जें आदरिलें कर्म विमोहें त्यातें 'तामस' म्हणती ४४

२६ यशीं अपयशीं निर्विकार जो असंग निरहंकारी
जो उत्साही सुधीर कर्ता तो 'सात्त्विक' अवधारीं ४५

२७ हिंसक लोभी अपवित्र तसा फल-कामुक आसक्त
हर्ष-शोक-युत म्हणती कर्ता तो 'राजस' निभ्रांत ४६

२८ जो स्वच्छंदी शठ हटवादी नीच आळशी खिन्न
असे सुस्त संस्कार-हीन तो कर्ता 'तामस' जाण ४७

२९ तुज बुद्धीचे तसे धृतीचे गुणानुसार त्रि-विध
संपूर्णपणें वेगवेगळे ऐक सांगतों भेद ४८

३० विधि-निषेध भय-अभय जाणते पार्था, कार्य-अकार्य
बंध-मोक्ष जी ती चि निश्चिती 'सात्त्विक' बुद्धि होय ४९

३१ कसें काय तें कार्य कोणतें अकार्य नेणे चोख
धर्माधर्महि न ओळखे ती 'राजस' बुद्धी देख ५०

३२ सर्वार्थातें मानी उलटें जी धर्म अधर्मास
जाण 'तामसी' बुद्धि ती अशी तम आच्छादी जीस ५१

३३ समाधि-योगीं अढळ राहुनी इंद्रियें-मन-प्राण
चालवी क्रिया ह्यांच्या धृति जी ती 'सात्त्विक' तूं जाण ५२

३४ इथे प्रसंगोपात्त चालवी धर्म-अर्थ-कामातें
फलाशेंत जी गुंतवी धृती जाण 'राजसी' तीतें ५३

३५ निद्रा जोडी जी न च सोडी भय-विषाद-मद-शोक
तमांत बुडवी बुद्धि विघडवी धृति 'तामस' ती देख ५४

३६ तुज सांगितली अशी त्रि-धा हे धृति धनंजया, येथ
त्रि-विध सुख अतां ऐक भारता, होउनि सावध-चित्त ५५

जाण पांडवा, रमवी जीवा अभ्यासें आत्म-पदीं
आणिक साचें भव-दुःखाचें नांव हि राहों नेदी ५६

३७ आरंभी जें विष-सम सहजें अमृत-तुल्य परि अंतीं
आत्म-ज्ञानीं सुख निपजे तें 'सात्त्विक' ऐसें म्हणती ५७

३८ प्रारंभीं जें मधुर भासतें मारक विष-सम अंतीं
विषयेंद्रिय-संयोगें निपजे तें सुख 'राजस' म्हणती ५८

३९ निद्रालस्यें तसें प्रमादें घेरुनियां आत्म्यातें
आदी-अंतीं मोह घालितें म्हणती सुख 'तामस' तें ५९

४० भूत-मात्र तें इथे तेविं ते देव देव-लोकांत
पहा त्रि-भुवनीं नसे चि कोणी प्रकृति-गुण-विनिर्मुक्त! ६०

४१ ब्रह्म क्षत्रिय वैश्य शूद्र हे असे चार जे वर्ण
त्यांचीं कर्में विभागिती हे स्वभाव-सिद्ध त्रि-गुण ६१

४२ तप पवित्रता निग्रह शांती क्षमा ज्ञान विज्ञान
श्रद्धा ऋजुता हें स्वभावतां ब्रह्म-कर्म तू जाण ६२

४३ धृति वीरश्री तेज दक्षता अपलायन युद्धांत
दान प्रभुता हें स्वभावतां क्षात्र-कर्म निभ्रांत ६३

४४ कृषि गो-रक्षण वाणिज्य असें स्वभावतां वैश्याचें
करणें सेवा हें स्वभावतां कर्म जाण शूद्राचें ६४

४५ नर स्व-कर्मीं दक्ष राहुनी मोक्ष मिळवितो पार्था
स्वकर्म-निरता मोक्ष सर्वथा कसा ऐक तें आतां ६५

४६ जाण अर्जुना, करी प्रेरणा सहज भूत-मात्रातें
सत्तामात्रें असे व्यापुनी सदा सकळ विश्वातें ६६

सर्वात्मक जो तया पूजितां स्व-कर्म-कुसुमीं पार्था
मोक्ष-पद चि तें तत्त्वतां इथे सहजें येतें हाता ६७

विहिताचरणें अंगीं बाणे वैराग्य-दशा प्रबळ
सुविवेक-बळें अंतर उजळे होय सर्वथा विमल ६८

मग धनंजया, बोध व्हावया तया नुरे प्रतिबंध
स्व-बोधें असा तोडी सहसा तो कर्माचे बंध ६९

४७ पर-धर्माहुनि उणा गुणांनीं स्व-धर्म तरि तो युक्त
स्वधर्म-रत जो नर तो होतो होतो कर्म-बंध-निर्मुक्त ७०

४८ सहज-कर्म तें सदोष झालें तरी न वोसंडावें
तें चि करावें जीवें-भावें भलें तें चि मानावें ७१

आणिक पाहें पार्था, राहे धूर जसा अग्नींत
सहज-सिद्ध तो दोष राहतो तसा कर्ममात्रांत ७२

स्व-कर्म केलें तरी लाभलें इथे सहज नैष्कर्म्य
म्हणुनि पांडवा, स्वकर्म-सेवा जगीं एकली धर्म्य ७३

४९ धन सुत दारा असा पसारा संसाराचा भासे
निःसंग असे तयांत जैसें जळीं बिंब आभासे ७४

चित्त अंतरीं एकाग्र करी अन्य न कांहीं चिंती
आत्म्याठायीं जडुनी राही हृदयाच्या एकांतीं ७५

विषय-वासना शिवे न च मना पूर्ण-काम तो झाला
जगीं तयाला दिसे एकला केवळ आत्मा भरला ७६

आत्मानुभवें अविद्येसवें सरला विश्वाभास
आत्म-रूप जग मग तें उरलें कुठलें कर्म तयास ७७

मी-माझें हें सुटतां पार्था, सहज घडे संन्यास
पावे म्हणुनी स्व-कर्म करुनी तो नैष्कर्म्य-पदास ७८

५० नैष्कर्म्याची सिद्धि ही अशी इथे लाभतां परम
तुज संक्षेपें ऐक सांगतों कसा गांठितो ब्रह्म ७९

सर्वात्मक जें असे सर्व जें सर्वातीत हि पूर्ण
अद्वय सहजें एक ना दुजें अनिर्वाच्य ती खूण ८०

पार्था, साची ती ज्ञानाची जाणें निष्ठा परम
तन्मय होतां जिथे संपतें मोक्षाचेंही काम ! ८१

५१ तरी किरीटी, विवेक-तीर्थीं निज-बुद्धि करी शुद्ध
त्यजी उपाधी धैर्यें साधी इंद्रिय-वृत्ति-निरोध ८२

शब्दादिक ते विषय वोखटे क्षणिक असें जाणून
इष्टानिष्टीं पार्था, प्रीति-द्वेषा दूर करून ८३

५२ त्यजी जन-पदा राहतो सदा तो एकान्तीं विजनीं
अल्पाहारी स्वाधीन करी शरीर मानस वाणी ८४

आत्म-चिंतनीं जाय रंगुनी करुनी मन एकाग्र
ध्यान-योग-पर निरंतर असा त्यजुनी विषय समग्र ८५

५३ अहंकार बल दर्प सोडुनी क्रोध परिग्रह काम
निर्मम होतो शांत असा तो पूर्ण आकळी ब्रह्म ८६

५४ ब्रह्मानुभवें तया स्वभावें नुरे काम वा खेद
प्रसन्नतेनें सर्वां भूतीं देखे भाव अभेद ८७

आणि सर्वथा पावे पार्था, मद्भक्ति तदा परम
विश्व आटतें जिथे संपतें मोक्षाचेंही काम ! ८८

५५ मद्भक्तीनें यथार्थ जाणे असें केवढा कोण
माझ्या ठायीं विलीन होई मग यथार्थ जाणून ८९

जाणे अज मी असें अजर मी अक्षर मी अद्वैत
असें आद्य मी नित्य स्वामी सर्व हि सर्वातीत ९०

अचळ अच्युत स्वतंत्र सम मी व्यक्त हि मी अव्यक्त
असंग अक्रिय पुरुषोत्तम मी सहज अनादि अनंत ९१

असें ईश्य मी ईश्वर तो मी व्याप्य-व्यापक मीच
शून्य पूर्ण मी पर-ब्रह्म मी एक दुजें नाहींच ! ९२

अरूप माझें स्वरूप सहजें जाणतें हि तें मीच
जाणुनी असें तो हि समरसे अखंड मजमाजींच !! ९३

तेथ सर्वथा आटे द्रष्टा-दृश्य-दर्शन त्रिपुटी
नित्य अक्रिया सर्वत्र तया अखंड माझी भेटी ९४

तो देखे तें दर्शन माझें बोले तें तें स्तवन
करी तेतुली पूजा चि भली चाले तें मज गमन ९५

तरंग-पाणी प्रकाश-अग्नी जैसीं एक अभिन्न
समरस होतों एक तेविं तो भक्त आणि मी जाण ९६

जरी स्वभावें कर्म आघवें करी तरी तो मुक्त
ब्रह्मानुभवें अद्वैतत्वें मुक्त होऊनी भक्त ! ९७

ऐशा रीती जी अद्वैतीं भक्ति संभवे पूर्ण
आत्मानुभवी तो चि अनुभवी अनिर्वाच्य ती खूण !! ९८

५६ जरी आदरी कर्में सारीं सदा सेवुनी मातें
मत्कृपा-बळें तया लाधलें शाश्वत पद अव्यय तें ९९

५७ कर्में सारीं समर्पण करीं मज मत्पर-वृत्तीनें
सम-बुद्धि सदा ठेवुनि होईं माझा अंतःकरणें १००

५८ चित्त सर्वथा अनन्य होतां माझ्या ठायीं पूर्ण
सर्व संकटें तरशील इथे मत्कृपा-बळें जाण १०१

धरुनि मीपणा जरी अर्जुना, न च मद्वच आदरिसी
तरी निश्चयें तुझा तूं स्वयें विनाश करुनी घेसी १०२

५९ मी न च झुंजें म्हणसि असें जें धरुनि अहंता चित्तीं
होईल वृथा निश्चय पार्था, टिकेल नच तो अंतीं १०३

मोह आवरीं शस्त्र सांवरीं आग्रह न धरीं येथ
स्वभाव-सिद्ध क्षात्र-धर्म तुज झुंजवील निभ्रांत १०४

शौर्य तेज धृति इत्यादिक तीं स्वाभाविक तुजमाजीं
त्यजुनी भ्रांती म्हणुनी हातीं शस्त्र धरावें आजी १०५

६० अससी पार्था, बद्ध आपुल्या प्रकृति-सिद्ध कर्मांनीं
मोहें न करूं इच्छिसी बळें तें करिशील निदानीं ! १०६

६१ पार्था, पाहें ईश्वर राहे सर्व-भूत-हृदयांत
निज-मायेनें तो चि खेळवी जगत्सूत्र निभ्रांत १०७

घालुनि यंत्रीं माया-सूत्रीं तो परमेश नियंत्री
भूतें सगळीं जशीं बाहुलीं सूत्र-धार कळसूत्रीं १०८

६२ त्या हृदयस्था शरण सर्वथा जाई अर्जुना, भावें
जसें जाह्नवी-जळ सर्वस्वीं सागराकडे धांवे १०९

कृपा तयाची होतां साची स्वानंदैकनिधान
पावशील तूं परम शांतिचें दिव्य अव्यय स्थान. ११०

६३ तुज सांगितलें असें हें भलें पावन आत्म-ज्ञान
असे चि सहजें धनंजया, जें माझें गुप्त निधान १११

सर्वतोपरी तूं चि विचारीं मनीं एक निर्धारीं
आणि मानलें उचित तें करीं धरीं शस्त्र वा न धरीं ११२

६४ तूं चि भारता, बहु आवडता हितार्थ कथितों उघड
ऐक पुन्हां मद्वचन परम तें जें गूढांतिल गूढ ११३

६५ मन मी चि करीं तूं प्रीति धरीं मद्भजनीं अविकारी
अभेद-चित्तें मज एकातें सर्वत्र नमस्कारीं ११४

स्वकर्म-यज्ञा यजुनी प्राज्ञा संतुष्ट करीं मातें
न धरीं किंतु पावशील तूं निश्चित मद्रूपातें ११५

प्रतिज्ञेवरी सांगतों तरी सत्य वचन हें मान
बहु आवडसी पार्था, मजसी मी तूं एक चि जाण ! ११६

६६ अगा शरण ये मज एकातें सर्व धर्म सोडून
तुज खेद नको सोडवीन मी सर्व पातकांतून　　११७

आत्म-ज्ञानें दूर सारुनी स्वर्ग-नरक-संसा
सोऽहं-भावें तन्मय होईं मद्रूपीं साचार　　११८

मी चि होउनी मातें भजणें शरणागति ही निरुती
जाण तत्त्वतां ही स्वभावतां अव्यभिचारी भक्ती !　　११९

६७ तपोहीन जो अभक्त किंवा श्रवणेच्छा न जयास
पार्था, पाहें नको नको हें शिकवूं शास्त्र तयास　　१२०

अथवा निंदी जो पाखंडी मजसी वा मद्भक्तां
नको दाखवूं नकोचि शिकवूं तया शास्त्र हें पार्था　　१२१

६८ परि प्रकटवी थोर गूढ हें जो नर मद्भक्तांतें
भक्ति-बळें तो मला पावतो संशय न धरीं येथें　　१२२

६९ अधिक त्याहुनी न करी कोणी प्रिय माझें निभ्रांत
न होय कोणी अन्य त्याहुनी प्रिय मजसी जगतांत　　१२३

७० धर्म-रूप संवाद आमुचा पढेल हा जो कोणी
असें मानितों पूजी मज तो ज्ञान-यज्ञ आचरुनी　　१२४

७१ करी श्रवण हि श्रद्धा धरुनी जो निर्मत्सरतेनें
होय तयातें सहज सुलभ तें शुभ-लोकीचें पेणें　　१२५

मुक्तात्मा तो सुखें भोगितो स्वर्ग-लोक-संपत्ति
आणि निदानीं घेतो करुनी मद्रूपाची प्राप्ति !　　१२६

७२ पार्था, पाहें मोक्ष-प्रद हें पावन शास्त्र समग्र
ऐकिलेंसि ना भक्ति-निधाना, करुनि चित्त एकाग्र १२७
सांग सर्वथा नष्ट जाहली ना अज्ञान-भ्रांति ?
आणि संप्रति ज्ञान-जागृती तुज आली ना पुरती ?'' १२८
७३ अर्जुन बोले, 'त्वत्कृपा-बळें ज्ञान लाभलें पूर्ण
मोह पळाला संशय गेला सर्वथैव निरसून १२९
असती कर्ता तूं चि करविता सर्वत्र तुझी सत्ता
रिता तुजविना ठाव दिसेना आला अनुभव पुरता १३०
जगच्चालका, विश्व-पालका, नटुनि अणुअणूंतून
तूं चि आपणासवें खेळसी विश्व-रूप लेवून १३१
मीपण गळलें मज आकळलें विश्व तुझ्या आधीन
म्हणुनी सर्वथा झालों आतां तुजमाजीं चि विलीन ! १३२
वाक्य तव खरें त्याहुनि दुसरें न च पाहें कंसारे
भक्त तव असें सांगसी तसें आचरेन निर्धारें !' १३३
७४ संजय बोले, ''भाग्य आगळें माझें म्हणुनी येथ
कौरवेश्वरा, असा परिसिला हा संवाद यथार्थ १३४
परमात्मा श्रीकृष्ण थोर तो तसा महात्मा पार्थ
अत्यद्भुत संवाद तयांचा तनु रोमांचित करित ! १३५
७५ व्यास थोर गुरु-देव महर्षी कृपा तयांची पूर्ण
म्हणुनी साक्षात् श्रीकृष्ण-मुखें श्रवणीं पडलें ज्ञान ! १३६

राजा, योगेश्वरें निजांगें धनंजयातें साङ्ग
जो सांगितला तो चि ऐकिला गुह्य परम हा योग　१३७

७६ अद्‌भुत पावन नित्य सुख-द हा कृष्णार्जुन-संवाद
स्मरुनी वारंवार चाखितों पर-तत्त्व-रसास्वाद　१३८

आणि हर्षतों सुखें डोलतों होउनियां तल्लीन
धन्य जाहलों राजा, गेलों देहभान विसरून !　१३९

७७ तेविं आठवीं पुनः पुन्हां तें विश्व-रूप तेजाळ
अद्‌भुत साचें भगवंताचें सुभव्य दिव्य विशाळ !　१४०

विस्मय वाटे चित्तीं दाटे आनंदाचें भरतें
मुळीं न आटे नित्य नवें तें दर्शन-सुख मज होतें !!　१४१

७८ **योगेश्वर तो श्रीकृष्ण जिथे जिथे धनुर्धर पार्थ**
**जय संपत्ति वैभव नीति नित्य मानितों तेथ.''**　१४२

असा अष्टादशाध्यायीं मोक्षसंन्यास-योग हा ।
येथें भावार्थ गीतेंत भावार्थें उपदेशिला ॥ १८ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥